मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०२३। पान १


# शहरात वाढले ३९ हजार मतदार!

## आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीची तयारी

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार पुनर्निरीक्षण कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याचा पहिला टप्पा झाला असून दुसरा टप्पा २७ ऑक्टोबरपासून सुरू झाला आहे. नऊ डिसेंबरपर्यंत पुनर्निरीक्षण केले जाणार आहे. आतापर्यंत मयत मतदार, पत्ता बदललेले मतदार, दुबार नावे वगळून नवमतदारांची नोंदणी केली आहे. त्यानंतरची प्रारूप मतदार यादी जिल्हा प्रशासनाने प्रसिद्ध केली. त्यानुसार गेल्या वर्षी एक जानेवारीच्या तुलनेत शहरातील मतदारसंख्या ३९ हजाराने वाढली आहे. यात चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघातील संख्या वाढलेली दिसत असून पिंपरीतील संख्या कमी झाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, एक जानेवारी २०२४ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरिकांची मतदार नोंदणी व मतदार यादी पुनर्निरीक्षण केली जात आहे. पहिल्या टप्प्यात झालेल्या पुनर्निरीक्षण कार्यक्रमानंतर जिल्हा प्रशासनाने प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार शहरातील सर्वांत जास्त मतदार असलेला मतदारसंघ चिंचवड ठरला आहे. यापूर्वीही चिंचवड मतदारसंघ मोठाच होता. सर्वात कमी मतदार संख्या पिंपरीत होती. आताही पिंपरी मतदारसंघातील मतदार संख्या कमीच आहे. पुढील वर्षी



लोकसभा व विधानसभा निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार नोंदणी व मतदार पुनर्निरीक्षण मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत प्रामुख्याने नवीन मतदारांची नाव नोंदणी, दुबार नावे कमी करणे, मयत मतदारांची नावे कमी करणे, मतदार यादीमध्ये मतदारांचे छायाचित्र समाविष्ट करणे, पत्त्यामध्ये बदल आदी कामे केली जाणार आहेत. मतदारसंघ / मतदार (एक जानेवारी २२) / मतदार (ऑक्टोबर २०२३) / फरक (घट/वाढ) चिंचवड / ५,६६,५७७ / ५,८५,७३१ / १९,१५४ वाढ पिंपरी / ३,६९,८०२ / ३,६३,८२९ / ५,९७३ घट भोसरी / ५,००,५४७ / ,२६,८५८ / २६,३११ वाढ एकूण / १४,७६,४१८ / १४,३६,९२६ / ३९,४९२ वाढ नवमतदार नोंदणी व मयत, घर सोडून गेलेले वगळल्याने पिंपरीतील संख्या कमी - चिंचवड व भोसरी मतदारसंघात नव्याने समाविष्ट गावांचा समावेश असून अनेकजण नव्याने राहायला आली आहेत निगडीपर्यंतचा भाग पिंपरी मतदारसंघात येतो, या भागातील बहुतांश नागरिकांनी उपनगरांत घरे घेतली आहेत - भोसरीतील चिखली, मोशी, चऱ्होली, डुडुळगाव भागात मतदार संख्येत अधिक वाढ - चिंचवडमधील ताथवडे, पुनावळे, रावेत, किवळे भागात मतदार संख्येत अधिक वाढ भोसरीत आजपासून पुनर्निरीक्षण केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, एक जानेवारी २०२४ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरिकांची मतदार नोंदणी व मतदार यादी पुनर्निरीक्षण केली जात आहे. त्याअंतर्गत भोसरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी शनिवार (ता. ४) आणि रविवारी (ता. ५) प्रत्येक मतदान केंद्रांवर मतदार नोंदणी मोहीम आयोजित केली आहे. त्याअंतर्गत नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नोंदीच्या तपशिलाची दुरुस्ती, मयत मतदार वगळणीचे अर्ज मागविले आहेत. त्यात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा. जास्तीत जास्त नवमतदार, महिला, दिव्यांग, भटके विमुक्त, तृतीय पंथी मतदार या सर्वांची देखील नाव नोंदणी केली जाईल, असे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रेवणनाथ लबडे यांनी सांगितले.

# लागला शोध : कुणाच्या प्रेमात बायको आकंठ बुडाली?

## मोशी परिसरातील नागरिकांचा सुटकेचा नि:श्वास

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

'असा दगा द्यायला नको होता..', 'कुणाच्या तरी प्रेमात असणार ती..', 'कोणासोबत सुरू असेल तीचं'... अशा अनेक प्रश्नांनी मोशीसह पिंपरी-चिंचवडमध्ये लागलेल्या फ्लेक्समुळे एकच खळबळ उडाली होती. नेमका प्रकार काय आहे? हेच लक्षात येत नव्हते. मात्र, अखेर पिंपरी-चिंचवडकरांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. बांधकाम क्षेत्रातील आघाडीची संस्था नागेश्वर डेव्हलपर्स आणि गृहआरंभ यांच्या संकल्पनेतून 'सॉलिटर एम्पायर' नावाचा भव्य प्रकल्प मोशी येथे साकारला जात आहे. १, २ आणि ३ बीएचके सर्व सुविधांयुक्त या घरांचे लाँचिंग नुकतेच अनोख्या थाटात झाले आणि ''हेच ते, ज्याला बायको हृदय देवून बसली!' असा उलघडा झाला. 'तुझ्यात जीव रंगला' फेम अभिनेता हार्दिक जोशी यांचे पिंपरी-चिंचवड आणि परिसरात ''असा काय गुन्हा केला मी..?' , कुणासोबत सुरू असेल तीचं..?, 'असा दगा द्यायला नको होता..', 'कुणाच्या तरी प्रेमात असणार ती..', असे प्रश्न उपस्थित करणारे मोठे फ्लेक्स शहरभरात गेल्या काही दिवसांपूर्वी झळकले आहेत. त्यामुळे 'राणादा'च्या वैवाहिक जीवनात काही वादळ तर निर्माण झाले नाही ना? अशी चर्चा आणि तर्कवितर्कांना उधाण आले होते. दरम्यान, नागेश्वर डेव्हलपर्स आणि गृहआरंभ यांच्या संकल्पनेतून 'सॉलिटर एम्पायर' भव्य प्रकल्प लाँच झाला. या लाँचिंगमुळे अक्षदा देवधर आणि हार्दिक जोशी

### सॉलिटर एम्पायर'मुळेच सुचत नव्हतं

» आधुनिक इन्फ्रास्ट्रक्चर, उत्तम कनेक्टिव्हिटी आणि वर्कस्पेस अशी वैशिष्ट्ये असलेला भव्य 'सॉलिटर एम्पायर' हा १, २ आणि ३ बीएचके प्रकल्प सादर करण्यात आला आहे. प्रकल्पाचे लाँचिंगच थाटात आणि क्युरॅसिटी निर्माण करणारे असल्यामुळे चर्चेचा केंद्रबिंदू ठरला असून, '' राणादाची बायको ज्याच्या प्रेमात पडली आहे आणि सतत त्याचाच विचार करत आहे..'' असा प्रकल्प ग्राहकांच्या पसंतीस उतरताना दिसत आहे.

अर्थात मराठी सिनेसृष्टीतील सुपरहीट जोडी 'राणादा आणि अंजली बाई' यांच्या वैवाहिक जीवनातील वादळाच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला.

# सायकलस्वाराचे प्रेरणादायी महाराष्ट्र दर्शन!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्याकडून उपक्रमाचे कौतूक



**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** केवळ आपला महाराष्ट्र न म्हणता प्रत्यक्ष महाराष्ट्र पाहून त्याला गवसणी घालण्याचे स्वप्न ६६ वर्षांच्या प्रकाश पाटील यांनी पाहिले. ६६ दिवसांत ३६ जिल्ह्यांचा सायकलवरून प्रवास करण्याचा अनोखे अभियान त्यांनी सुरू केले. हा प्रवास त्यांनी यशस्वी पूर्णही करून दाखविला. नुकतेच आळंदी येथे त्यांच्या या उपक्रमाचा समारोप झाला. या प्रवासादरम्यान आरोग्य, पर्यावरण रक्षण आदी संदेश युवकांमध्ये देखील रुजविण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या या उपक्रमाचे आमदार महेश लांडगे यांनी कौतूक करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. संतांचा पदस्पर्श झालेली ही पावन भूमी आहे. तसेच छत्रपती शिवरायांनी घडविलेल्या मावळ्यांचा आणि स्वराज्याचा हा प्रांत आहे. त्यामुळे महाराष्ट्राविषयी अभिमान असल्याचे अनेक जण सांगत असतात. मात्र केवळ अभिमान असून उपयोग नाही. तर हा महाराष्ट्र नेमका कसा आहे, हे प्रत्यक्ष पाहता यावे, यासाठी सायकलवरून भ्रमंती करण्याचे ध्येय प्रकाश पाटील यांनी पाहिले. त्यानुसार महाराष्ट्रातील ३६ जिल्हे फिरण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. २७ ऑगस्ट २०२३ रोजी भोसरी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला अभिवादन करून त्यांनी या भ्रमंतीला सुरूवात केली. कामगार नेते सचिन लांडगे यांच्या उपस्थितीत सायकल अभियानाला सुरुवात झाली होती. त्यानंतर रायगड, नवी मुंबई, जूनी मुंबई, ठाणे, पालघर, नाशीक, नंदूरबार, धुळे, जळगाव आदीसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रवेश केला. प्रत्येक जिल्ह्यात असणार्या तिथल्या वैशिष्ट स्थळांना भेटी दिल्या. तसेच, शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत या ठिकाणी पर्यावरण व सायकलचे महत्व पटवून दिले. सायकल का चालववावी, या विषयांवर महाराष्ट्र भर संदेश देण्याचे काम पाटील यांनी केले. गड, किल्ले पौराणिक मंदीरे अशा ठिकाणी भेटी देऊन प्रत्येक जिल्हातील सायकल मित्रांच्या भेटी घेतल्या. सायकल विषय एक दृढ नाते निर्माण करण्यासाठी पाटील यांनी सर्वत्र संदेश दिला. ६६ दिवसात ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण सायकलवरून ५ हजार ७०० किलोमीटरचा प्रवास त्यांनी केला. तर ६१५ किलोमीटरचा पायी प्रवास त्यांनी पूर्ण केला आहे. त्यांनी घेतलेला हा निर्णय ध्येयवेड्या माणसाचाच असू शकतो, अशा भावना आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या. या प्रवासादरम्यान पाटील यांनी प्रत्येक जिल्ह्यातून माती व पाणी घेऊन आले आहेत. त्या त्या जिल्हाच्या नावाने दिघी येथील दत्त गडावर वृक्षारोपण करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. महाराष्ट्राच्या आराखडा (मॅप) प्रमाणे प्रत्येक शहराच्या नावाने वृक्ष लागवड त्याच जिल्ह्याच्या व्यक्तीच्या हातून करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. त्यामुळे नवीन वृक्ष मित्राची भर पडेल, असे प्रकाश पाटील म्हणाले.

> **“ सध्याच्या युगात सर्वांनी आरोग्य जपले पाहिजे. विशेषतः तरुणांनी त्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. या बरोबरच पर्यावरणाचा र्‍हास रोखणे ही आपली जबाबदारी आहे. माझ्या सायकलवरून केलेल्या भ्रमंतीवेळी हा संदेश युवकांमध्ये रुजविण्याचे काम मी केले. तसेच केवळ आपला महाराष्ट्र असे न म्हणता प्रत्यक्ष महाराष्ट्राला पाहून घेण्याच्या माझ्या जी जिद्दीने मी सायकलवरून ही भ्रमंती केली.**
>
> **– प्रकाश पाटील, सायकल मित्र, पुणे.**

# मोशीत मराठा समाजाचे ‘जागरण गोंधळ’

## मराठा आरक्षण : साखळी उपोषणाद्वारे लक्ष वेधले



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाजाला आरक्षण मिळावे. या करिता राज्यभर आंदोलन पेटले असतानाच मोशी येथील सकल मराठा समाजाच्या वतीने ‘जागरण गोंधळ’ करुन सरकारचा निषेध करण्यात आला. सकल मराठा समाज, मोशी यांच्या वतीने मराठा समाजला आरक्षण मिळावे आणि सरकारला जाग यावी यासाठी जागरण गोंधळ आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनाला मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या ५ दिवसांपासून समाजाच्या वतीने साखळी उपोषण सुरू होते. दरम्यान, मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले. राज्य सरकारने त्यांच्या अटी-शर्ती मान्य केल्या आहेत. त्यामुळे मोशीतील बेमुदत साखळी उपोषण मागे घेण्यात आले. यापुढील काळात मनोज जरांगे-पाटील मराठा आरक्षणाच्या लढ्यामध्ये जी भूमिका घेतील, त्यानुसार आंदोलनाची दिशा ठरवण्यात येणार आहे.

# शहर पोलीस दलातील सहाय्यक आयुक्तांच्या अंतर्गत नेमणुका!

**मोशी। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहर पोलीस दलातील सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या अंतर्गत नेमणूक करण्यात आल्या आहेत. राज्यातील पोलीस निरीक्षकांच्या पदोन्नती झाल्यानंतर शहरात आलेल्या सहाय्यक आयुक्तांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये वाहतूक विभागासाठी दोन सहाय्यक आयुक्त देण्यात आले आहेत. याबाबतचे आदेश शुक्रवारी (दि. ३) रात्री पोलीस आयुक्तांनी दिले.

सहाय्यक पोलीस आयुक्त भास्कर डेरे यांच्याकडे प्रशासन विभागाची जबाबदारी होती. त्यांची नेमणूक वाहतूक शाखेत करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत पिंपरी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सतीश कसबे यांची देखील वाहतूक शाखेत नेमणूक करण्यात आली आहे.

तर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे यांची सहाय्यक पोलीस आयुक्त पिंपरी विभाग येथे नेमणूक झाली आहे.

# पुणे विद्यापीठात गुंड कसे घुसले?

## खासदार सुप्रिया सुळेंची चौकशीची मागणी

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या संघटनांमध्ये हाणामारी झाल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी पुन्हा एकदा विद्यापीठात राजकीय राडा झाला. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आणि स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आधी बाचाबाची आणि नंतर हाणामारी झाली.

या हाणामारीच्या प्रकारावर राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेवरून भारतीय जनता पक्षावर निशाणा साधला आहे. तसेच याप्रकरणी चौकशीची मागणीदेखील केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी विद्यापीठातील वसतिगृहाच्या भिंतीवर आक्षेपार्ह मजकूर लिहिण्यात आल्याबाबत कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केली होती. या कृतीच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर निषेध आंदोलन केलं.




या आंदोलनादरम्यान, भाजपा कार्यकर्ते आणि विद्यापीठात सदस्य नोंदणी करत असलेल्या स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडियाचे कार्यकर्ते यांच्यात बाचाबाची झाली. यावेळी जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेची दखल घेत मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे.

यात त्यांनी म्हटलं आहे की, आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भाजपाप्रणित विद्यार्थी संघटनेच्या मुलांनी दुसऱ्या विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थ्यांना मारहाण केली आणि त्यानंतर विद्यापीठात आंदोलन करायला सुरुवात केली. पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या शहरात कोणत्याही शैक्षणिक परिसरात अशा पद्धतीने राजकारणाचे खेळ करणं सत्ताधारी पक्षाला शोभत नाही. शैक्षणिक परिसराचे पावित्र्य आणि शांतता भंग करण्याचा अधिकार या लोकांना नाही.

खासदार सुळे यांनी म्हटलं आहे की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात खेड्यापाड्यातून आलेल्या गरीब विद्यार्थ्यांना मारहाण करणारे गुंड विद्यापीठात कसे घुसले आणि त्यांनी कोणत्या अधिकाराने या मुलांना मारहाण केली? याची कसून चौकशी होण्याची गरज आहे. गृहमंत्र्यांचे (देवेंद्र फडणवीस) या गुंडगिरीला अभय आहे का? याचाही खुलासा यानिमित्ताने व्हायला हवा. विद्यापीठाच्या कुलगुरू महोदयांनी याबाबत तातडीने निर्णय घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी.

### सुप्रिया सुळे यांनी घेतली दखल

**» राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेची दखल घेत मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे. यात त्यांनी म्हटलं आहे की, आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भाजपप्रणित विद्यार्थी संघटनेच्या मुलांनी दुसऱ्या विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थ्यांना मारहाण केली आणि त्यानंतर विद्यापीठात आंदोलन करायला सुरुवात केली. पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या शहरात कोणत्याही शैक्षणिक परिसरात अशा पद्धतीने राजकारणाचे खेळ करणं सत्ताधारी पक्षाला शोभत नाही. शैक्षणिक परिसराचे पावित्र्य आणि शांतता भंग करण्याचा अधिकार या लोकांना नाही.**

# निगडी ते हिंजवडी मेट्रो धावणार!

## मेट्रो करणार सर्वंकष वाहतूक आराखडा

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे, पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी पुणे महामेट्रोने सर्वंकष वाहतूक आराखडा (कॉंप्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन) तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. पुढील सहा महिन्यांत त्याचे काम पूर्ण होईल. त्यानंतर मेट्रोचे नवीन मार्ग करण्यात येणार असून, निगडी ते हिंजवडी अशी नवीन मेट्रो मार्गिका तयार करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.



वर्षाला सव्वालाख लोकसंख्येची भर पडत आहे. त्यामुळे वाहतुकीचे सर्वेक्षण आवश्यक आहे. शहरातील प्रमुख रस्त्यावरून तासाला दुचाकी, चारचाकी, बस, ट्रक, तीनचाकी अशी किती वाहने धावतात. कोणत्या दिशेने जातात. पादचाऱ्यांचे प्रमाण किती आहे. विशिष्ट वेळेत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या आधारे हे सर्वेक्षण केले जाणार आहे. ज्या मार्गावर जास्त वर्दळ राहील याचा अंदाज घेऊन नवीन मेट्रो मार्ग विकसित केला जाणार आहे. मेट्रोचे कासारवाडी स्थानक वर्दळीचे आहे. नाशिक फाटा येथून नाशिकला आणि चाकणला जाणाऱ्या लोकांची संख्या किती याचा अभ्यास केला जाणार आहे. नाशिक फाटा ते चाकण आणि वर्तुळाकार रस्त्यांवर (एचसीएमटीआर) 'निओ मेट्रो' विकसित करण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार असल्याचेही त्यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक कंपन्यांमधील अनेक कामगार पुण्यातून कंपनीच्या खासगी बसने प्रवास करतात. मेट्रोने प्रवास करावा यासाठी त्यांच्याशी चर्चा सुरू आहे. कामगारांनी वल्लभनगरपर्यंत मेट्रोने आणि तेथून खासगी बसने प्रवास करावा, असे प्रयत्न सुरू आहेत. दिल्लीत लोक पायी, सार्वजनिक वाहतुकीने मेट्रो स्थानकापर्यंत येतात. त्यामुळे तेथील मेट्रोला प्रतिसाद मिळतो.

> **“निगडीपर्यंतच्या मेट्रो कामाची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. जागेची काही अडचण नाही. स्थानकांवर येण्या-जाण्यासाठीच भूसंपादन करावे लागणार आहे. तीन महिन्यांत प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. साडेतीन वर्षांत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.**
>
> **— श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, पुणे महामेट्रो**

# एसटी बसचे भाडे महागले!

## ऐन दिवाळीत प्रवाशांच्या खिशाला कात्री

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** दिवाळी सुट्टीत एसटीने प्रवास करण्याचे नियोजन करणाऱ्या प्रवाशांना आता अधिक खिसा रिकामा करावा लागणार आहे. एसटी महामंडळाने सर्व प्रकाराच्या एसटी गाड्यांमध्ये सरसकट १०% भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ८ नोव्हेंबरपासून ही दरवाढ लागू होणार आहे. आरक्षण केलेल्या प्रवाशांनाही भाडेवाढीची झळ सहन करावी लागणार आहे. दिवाळीतील धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज असे सण नातेवाईकांसह साजरे करण्याची प्रथा आहे. दिवाळीत शाळा-महाविद्यालयांनाही मोठी सुट्टी असल्याने सहकुटुंब गावी जाण्यासाठी गर्दी असते. यामुळे रेल्वे, खासगी गाड्यांसह एसटीही प्रवाशांनी भरून धावत असतात. यंदा ७ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून अर्थात ८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरदरम्यान एसटीच्या सर्व बसश्रेणींमध्ये १०% भाडेवाढ लागू करण्यात येत आहे. २८ नोव्हेंबरनंतर मुळ दराने तिकीट आकारणी सुरू होणार आहे. आरक्षित तिकीटाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाढीव



भाडेदरातील फरकाचे पैसे प्रवास करताना द्यावे लागणार आहेत, अशी माहिती एसटी महामंडळाने दिली आहे. एसटी ताफ्यातील १४ हजार बस प्रवासी सेवेत धावत आहेत. शिवनेरी, ई-शिवनेरी, शिवाई, अश्वमेध, परिवर्तन (लालपरी), हिरकणी, शितल, विना वातानुकूलित शयनयान, विना वातानुकूलित आसनी व शयनयान अशा सर्व बसश्रेणींसाठी भाडेवाढीनूसार तिकीट आकारण्यात येणार आहे. महसूल वाढीसाठी महामंडळाकडून अनेक उपाय राबवण्यात येत आहेत.

### बसश्रेणींमध्ये १०% भाडेवाढ

» एसटी ताफ्यातील १४ हजार बस प्रवासी सेवेत धावत आहेत. शिवनेरी, ई-शिवनेरी, शिवाई, अश्वमेध, परिवर्तन (लालपरी), हिरकणी, शितल, विना वातानुकूलित शयनयान, विना वातानुकूलित आसनी व शयनयान अशा सर्व बसश्रेणींसाठी भाडेवाढीनूसार तिकीट आकारण्यात येणार आहे. रेल्वे, खासगी गाड्यांसह एसटीही प्रवाशांनी भरून धावत असतात. यंदा ७ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून अर्थात ८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरदरम्यान एसटीच्या सर्व बसश्रेणींमध्ये १०% भाडेवाढ लागू करण्यात येत आहे. २८ नोव्हेंबरनंतर मुळ दराने तिकीट आकारणी सुरू होणार आहे. आरक्षित तिकीटाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाढीव भाडेदरातील फरकाचे पैसे प्रवास करताना द्यावे लागणार आहेत, अशी

# शहरातील २३ हजार मिळकती करकक्षेत

## १४३ कोटी रुपयांचे उत्पन्न महापालिकेच्या तिजोरीत जमा

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** करबुडव्या २३ हजार ५०० मिळकती महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने शोधून काढल्या आहेत. या मिळकती कर कक्षेत आल्याने त्यांच्याकडून १४३ कोटी रुपयांचे उत्पन्न महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले आहे. कर आकारणी न झालेल्या मिळकती शोधण्याची ही मोहीम तीव्र करण्यात येणार असल्याने महापालिकेच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे. शहराच्या जुन्या हद्दीमध्ये सुमारे अकरा लाख तर समाविष्ट गावांमध्ये दोन लाख मिळकतींना कर आकारणी करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत शहराच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर नव्याने बांधकामे झाली आहेत. त्यातील अनेक मिळकतींना कर आकारणी झाली नसल्याची तक्रार सातत्याने महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या



होत्या. तर काही मिळकतींनी वापरात बदल केला आहे. मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य आर्थिक स्रोत आहे. यंदा मिळकतकरातून १ हजार ८०० कोटींचे उत्पन्न अंदाजपत्रकात आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी गृहीत धरले आहे. तर मिळकतकरातून जवळपास ९ हजार कोटींची थकबाकी वसुलीचे कर आकारणी आणि कर संकलन विभागापुढे उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर मिळकतकर विभागाने थकबाकी वसुलीबरोबरच करबुडव्या मिळकतींचा शोध सुरू केला आहे. त्यांतर्गत चालू आर्थिक वर्षात आत्तापर्यंत २३ हजार ५०० मिळकतींचा शोध प्रशासनाने घेतला असून त्यासाठी मुख्य विभागाबरोबरच क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली आहेत. मिळकतीच्या वापरात बदल, साइड मार्जिनचा व्यावसायिक वापर, अनधिकृत आणि कर आकारणी न झालेल्या मिळकती शोधून काढण्यात येत आहे. तसेच थकबाकी असलेल्या मिळकतींना सील लावण्याची कार्यवाही केली जात आहे. चालू आर्थिक वर्षात महापालिकेच्या मिळकतकर विभागाने थकबाकी असलेल्या ५३१ मिळकतींना सील ठोकले आहे. त्यांच्याकडे एकूण ३८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. गेल्या वर्षी मिळकतकर विभागाने वापरात बदल केलेल्या मिळकतींची तपासणी केली असता, या तपासणीत निवासी मिळकतींचा व्यावसायिक वापर होत असल्याच्या १५ हजार २२९ मिळकती आढळून आल्या होत्या. त्यांच्याकडून १०१ कोटी ६६ लाख रुपये कर वसूल करण्यात आला होता. चालू आर्थिक वर्षात २३ हजार ५०० मिळकतींचा शोध घेण्यात आला आहे. यामध्ये कर आकारणी न होण्याबरोबरच वापरात बदल करण्यात आलेल्या मिळकतींचा समावेश आहे.

### मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य आर्थिक स्रोत

» गेल्या काही वर्षांत शहराच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर नव्याने बांधकामे झाली आहेत. त्यातील अनेक मिळकतींना कर आकारणी झाली नसल्याची तक्रार सातत्याने महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या. तर काही मिळकतींनी वापरात बदल केला आहे. मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य आर्थिक स्रोत आहे. यंदा मिळकतकरातून १ हजार ८०० कोटींचे उत्पन्न अंदाजपत्रकात आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी गृहीत धरले आहे.

> “ कर आकारणी आणि कर संकलन विभागाने २३ हजार ५०० मिळकती नव्याने कर कक्षेत आणल्या आहेत. त्यातून महापालिकेला १४३ कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. येत्या काळातही ही मोहीम सुरू राहणार आहे.
>
> – अजित देशमुख, उपायुक्त, कर आकारणी आणि कर संकलन विभाग, पुणे महापालिका